# राजकीय पक्षांची कार्यशाळा

**७ मे २०१८**

पाटकर सभागृह, एसएनटीडी महिला विद्यापीठ
चर्चगेट,
**मुंबई.**

**पार्श्वभूमी**

राज्य निवडणूक आयोगातर्फे राज्य घटनेतील ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त येथील एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात ७ मे २०१८ रोजी राजकीय पक्षांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. 'राजकीय पक्षांद्वारे सशक्त लोकशाही' हा कार्यशाळेचा विषय होता.

राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सत्र झाले. त्यांनी राज्य निवडणूक आयोगासंदर्भात सादरीकरण केले. आयोगाचे सचिव शेखर चन्ने यावेळी उपस्थित होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुहास पळशीकर यांनी 'राजकीय पक्ष: प्रतिमा आणि अपेक्षा' या विषयावर मांडणी केली. सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी यांनी 'राजकीय पक्षांकडून अपेक्षा' याबाबत विचार व्यक्त केले. पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेच्या प्रा. मानसी फडके यांनी 'महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका' या विषयावर सादरीकरण केले. उद्घाटन सत्रानंतर खुले चर्चासत्रही झाले.

कार्यशाळेत राज्य निवडणूक आयोगाच्या 'निवडणूक वार्ता'चेही विविध मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत सर्व पक्षांच्या प्रतिनिधींना कार्यशाळेसाठी आमंत्रित केले होते. राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष व मंत्री महादेव जानकरदेखील कार्यशाळेस उपस्थित होते.

**संवादासाठी कार्यशाळा: श्री. चन्ने**

श्री. शेखर चन्ने यांनी उपस्थितांचे स्वागत केले व कार्यशाळेच्या आयोजनाची भूमिका विशद केली. त्यातील ठळक मुद्दे असे:

- निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात निवडणुका घेण्यात राजकीय पक्षांची भूमिका अत्यंत मोलाची असते. त्यादृष्टीने संवाद साधण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.
- लोकशाही सुदृढ करण्यासाठी राजकीय पक्षांनी चांगले उमेदवार उभे करणे अपेक्षित आहे.
- निवडणुकांत आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, गुंड प्रवृत्तींना लांब ठेवणे, मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कृत्ये टाळणे, आचारसंहितेचे पालन करणे, पक्षांतर्गत लोकशाही असणे आदी मुद्द्यांवर या कार्यशाळेत चर्चा अपेक्षित आहे.

**उत्पन्नाचा स्त्रोत नमूद करणे आवश्यक: श्री. सहारिया**

श्री. सहारिया यांनी ७३ व ७४ वी घटना दुरुस्तीची वैशिष्ट्ये, निवडणुकांसंदर्भातील चिंतेचे मुद्दे, अपेक्षित निवडणूक सुधारणा इत्यादी विषयांचा परामर्श घेतला. याबाबत व्यापक विचारमंथनाची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. त्यांच्या सादरीकरणातील ठळक मुद्दे असे:

- सन १९९२ मधील ऐतिहासिक ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना संविधानिक दर्जा.
- स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला, अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सन १९९४ मध्ये राज्य निवडणूक आयोगाची स्थापना.
- राज्य निवडणूक आयोगाच्या स्थापनेपूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची जबाबदारी ग्रामविकास व नगरविकास विभागावर होती.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांद्वारे दर पाच वर्षांनी सुमारे २.५० लाख लोकप्रतिनिधींची निवड.
- राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, अधिकार व शक्ती भारत निवडणूक आयोगाप्रमाणेच.
- राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश पाळणे शासनावर बंधनकारक.
- राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांचे पालन न करणाऱ्या २२० राजकीय पक्षांची नोंदणी रद्द.
- नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे संकेतस्थळाद्वारे भरण्याची सुविधा.
- उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची व वित्तीय तपशिलांची मतदान केंद्रांबाहेर ठळक प्रसिद्धी.

- मतदार जागृती मोहिमेमुळे मतदार नोंदणीत लक्षणीय वाढ (सन २०१६- १२ लाख व २०१७- २१ लाख).
- मतदानाची टक्केवारीत मोठी वाढ (महानगरपालिका: सन २०१२- ४८.५९ व २०१७- ५६.४०.
- नगरपरिषदा/ नगरपंचायती: सन २०१२- ६५.१६ व २०१७- ७०.०० आणि जिल्हा परिषदा: सन २०१२- ६७.८१ आणि २०१७- ६९.०२.)
- आर्थिक बळाचा गैरवापर, गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार, मतदारांना प्रलोभने व आमिष देण्याची प्रवृत्ती, पक्षांतर्गत लोकशाहीबाबत प्रश्नचिन्ह आदी मुद्दे चिंतेचे ठरत आहेत.
- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शपथपत्रांमध्ये उत्पन्नाचा स्त्रोत नमूद करणे आवश्यक.
- उमेदवारांच्या अर्हतेसंदर्भातील पात्रता, अटी व निकष व्यापक करण्याची आवश्यकता.
- नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास नव्याने निवडणुका घेण्याची गरज.
- राजकीय पक्षांसाठी खर्च मर्यादा निश्चित करण्याची आवश्यकता.
- पाच वर्षांमध्ये एकही उमेदवार उभा न करणाऱ्या राजकीय पक्षाबाबत गांर्भीयाने विचार करण्याची अवशयकता.
- राजकीय पक्षांनी स्वच्छ प्रतिमा व समाजिक बांधिलकी असलेले उमेदवार उभे करणे आवश्यक.
- मतदारांना प्रलोभने व आमिष देणे टाळून आदर्श आचारसंहितेचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक.

**‘मतदार संरक्षण कायदा’ची गरज: डॉ. चौधरी**

डॉ. विश्वंभर चौधरी यांनी ‘राजकीय पक्षांकडून अपेक्षा’ या विषयावर आपली मते मांडली. निवडणूक यंत्रणेबाबतही त्यांनी काही अपेक्षा व्यक्त केल्या. त्यांच्या मांडणीतील ठळक मुद्दे असे:

- राज्य निवडणूक आयोग स्वायत्त आहे; पण स्वतंत्र नाही. निरपेक्ष निवडणुका आणि सरकारी पक्षाचा हस्तक्षेप टाळण्यासाठी स्वायत्ततेबरोबरच निवडणूक आयोग स्वतंत्रदेखील असणे आवश्यक आहे.
- ‘भारतीय प्रशासकीय सेवा’ व ‘भारतीय पोलीस सेवे’च्या धर्तीवर ‘इंडियन इलेक्शन सर्व्हिसेस’ (IES) असावी. या अधिकाऱ्यांचा शासनाच्या आस्थापनेशी संबंध नसावा.
- मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण करण्याची प्रक्रिया निरंतर असावी. मतदार याद्या तयार करणारी यंत्रणा अधिक सक्षम करावी. याबाबत नागरिकांतही जबाबदारीची भावना निर्माण व्हायला हवी.
- निवडणूक जाहीरनाम्यातील अश्वासनांची पूर्ती होत नाही. त्यासाठी ग्राहक संरक्षणाप्रमाणे ‘मतदार (मालक) संरक्षण कायदा’ची गरज आहे.
- प्रलोभनांचा प्रश्न गंभीर आहे. लोकांच्या पैशातून नको ती आश्वासनेही दिली जातात. राजकीय पक्ष कमी पडत असल्यामुळे एकूणच लोकशाहीचे वैयक्तिकीकरण झाले आहे.
- नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास नव्याने निवडणूक घेण्यात यावी. फेरनिवडणुकीत सर्व जुने उमेदवार अपात्र ठरवावेत.
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमुळे उमेदवारांना मतदान केंद्रनिहाय मिळालेली मते जाहीर केली जातात. परिणामी मतदानाची गोपनियता राहत नाही. याचा त्रास अल्पसंख्याक घटकांना सोसावा लागतो. त्यासाठी टोटलाईझरचा वापर करून उमेदवारांना मिळालेली मते मतदान केंद्रनिहायऐवजी एकत्रितरीत्या जाहीर करावीत.
- निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक असाव्यात आणि त्या तशा दिसाव्यातही. म्हणून मतदान यंत्रांबाबत शंका असल्यास त्यांचे निश्चितच निरसन केले पाहिजे.
- फ्लेक्समुळे शहरांचे व गावांचे विद्रुपीकरण होत आहे. विकासाऐवजी फ्लेक्समधूनच नेतृत्व येऊ लागले आहे, हे गंभीर आहे. राजकीय पक्षांनीच यावर मार्ग काढावा.
- राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्यांबाबत पारदर्शकता असावी. देणग्यांमुळे हितसंबंधांचा (कॉंफ्लिक्ट ऑफ इंट्रेस्ट) प्रश्न निर्माण होतो. आयोगाने देणग्यांची किमान यादृच्छिक (रँडम) पद्धतीने तपासणी करावी.

- राजकीय पक्षांनी स्वत:हून माहिती अधिकाराखाली यायला हवे. ध्येय, धोरणांचा समावेश नसला तरी किमान त्यांचे आर्थिक व्यवहार माहिती अधिकारात असावेत.
- राजकीय पक्षांनी आपला जमा- खर्च संकेतस्थळावर स्वत:हून टाकावा. यातून पक्षांमध्ये पारदर्शकतेची स्पर्धा निर्माण होऊ शकते.
- जनता सक्षम होण्याऐवजी राजकीय पक्ष सक्षम होत आहेत. वास्तविक राजकीय पक्ष लोकांचे वाहक आहेत. लोक सक्षम झाले पाहिजेत.
- लिलावाद्वारे सरपंच निश्चित करून निवडणूक टाळण्याचा प्रकार गंभीर आहे. हा लोकशाहीच्या मूळ तत्वांवरच घाला आहे.
- निवडणूक काळात आचारसंहिता असतेच; पण ऐरवीदेखील कायमस्वरूपी किमान आचारसंहिता असावी. फक्त ही आचारसंहिता अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या आड येऊ नये.
- एखादा पक्ष सार्वजनिक प्रश्नांवर काम करत असल्यास निवडणूक लढविली नाही, म्हणून त्याची नोंदणी रद्द होऊ नये. निवडणूक न लढण्याचा हक्कही मान्य केला पाहिजे.
- पक्षांतर्गत लोकशाही हा केवळ देखावा आहे. पक्षांतर्गत लोकशाहीला असलेला धोका मूळ लोकशाहीवरच घाला घालू शकतो.
- निवृत्तीपूर्वी काही अधिकारी एखाद्या राजकीय पक्षाचे हितसंबंध जोपासतात. निवृत्तीनंतर ते लगेचच संबंधित पक्षात प्रवेश करतात; थेट निवडणुकाही लढवितात. निवृत्तीनंतर यात किमान दोन- तीन वर्षे खंड असावा.

**लोकप्रियतेबरोबर विश्वास महत्वाचा: डॉ. पळशीकर**

डॉ. सुहास पळशीकर यांनी ‘राजकीय पक्ष: प्रतिमा आणि अपेक्षा’ या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्वक व चिंतनशील विवेचन केले. त्यांच्या मांडणीतील ठळक मुद्दे असे:

- राजकीय पक्ष म्हणजे “सत्ता मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी खुल्या स्पर्धेद्वारे प्रयत्न करणारे गट होय.”
- लोकांना संघटित करून आपल्या बाजुला वळवणे हा राजकीय पक्षांच्या कामाचा गाभा आहे.
- लोकांना आपल्याकडे वळविण्यासाठी कार्यक्रम, धोरणे, विचारप्रणाली, घोषणा, प्रतीके, भावनिक आव्हाने, नेतृत्व, लोकसेवा इत्यादींची राजकीय पक्षांना गरज असते.
- कोणत्याही समाजात मतभेद, गट आणि बहुविध हितसंबंध अपरिहार्य असतात.
- लोकशाहीच्या खुल्या स्पर्धेत आणि निवडणुकांमध्ये राजकीय पक्ष मध्यवर्ती असतात.
- स्वातंत्र्यपूर्व काळात विविध चळवळी, सुधारणा, वाटाघाटी, मर्यादित निवडणुका इत्यादींमधून राजकीय पक्षांची निर्मिती.
- स्वातंत्र्यानंतर संविधानाने प्रदान केलेल्या संघटना स्वातंत्र्याच्या बळावर व मताधिकारावर आधारित खुल्या निवडणूक पद्धतींमुळे राजकीय पक्षांना मोठा वाव.
- देशाचे नियंत्रण राजकीय पक्ष करतात; पण राजकीय पक्षांचे नियंत्रण कोण करतं? हा व्यवस्थेतील विरोधाभास आहे.
- आपणच आपले नियंत्रण करण्याचे भान न ठेवल्यास व्यवस्था कोलमळते. तसे झाल्यास लोक विरोधात जातात.
- एका अभ्यासाच्या निष्कर्षानुसार सन २००५ मध्ये राजकीय पक्षांवर ३६ टक्के नागरिकांना विश्वास होता. सन २०१३ मध्ये फारसा फरक जाणवला नाही. कारण ३७ टक्के लोकांनीच विश्वास दर्शविला.
- राजकीय पक्षांवर विश्वास दर्शविण्याचे प्रमाण सन २००५ मध्ये ४९; तर सन २०१३ मध्ये ४६ टक्के आढळून आले.

- साधारणत: पोलीस किंवा अधिकाऱ्यांविषयी अविश्वासाचे प्रमाण जास्त असते; परंतु राजकीय पक्षांवर अविश्वास असणे म्हणजे लोकांचे नेतृत्व करणाऱ्यांवरच लोकांचा विश्वास नसणे, हे गंभीर आहे.
- जागतिक विचार केल्यास तुलनेने भारतात लोकांचा राजकीय पक्षांवर जास्त विश्वास आहे, हे आपल्या राजकीय पक्षांचे श्रेय मानावे लागेल.
- राजकीय पक्ष आवश्यक आहेत; पण पक्षांचा व्यवहार लोकशाही पद्धतीचा असतोच, असे नाही. पक्ष सतत लोकांमध्ये असतात. तरीही पक्षांवर ठराविक लोकांचेच वर्चस्व असते. तरीही अनेक समूह प्रतिनिधित्वाविना राहतात.
- लोक राजकीय पक्षांवर विश्वास ठेवत नाहीत; पण आपल्या कामांसाठी पक्षांकडेच जातात. यावरच आपल्या देशाचे राजकारण चालते.
- राजकीय पक्ष स्थापन करणे अतिशय सोपे आहे; पण टिकविणे कठीण असते. चालविणे त्याहून अवघड आहे.
- कार्यकर्ते, सभासद, निधी आदींचा कोणीही विचार करत नाही; पण पक्ष चालविताना हे लागते. काही पक्ष पदार्पणातच जोरदार यश संपादन करतात; पण नंतर फारसे यशस्वी होताना दिसत नाही.
- राजकीय पक्षांची बराच काळ छोटा पक्ष म्हणून राहण्याची तयारी असावी लागते. सत्ता आणि पदांचे उद्दिष्ट नैसर्गिक आहे; परंतु वाट पाहण्यास कोण तयार असते? अधीर नेते आणि कार्यकर्ते ही अडचण आहे.
- लोकसभेच्या सन २००९ मधील निवडणुकीत ४६५; तर सन २०१४ मधील निवडणुकीत ३६३ पक्षांनी आपले उमेदवार उभे केले होते. त्यापैकी या दोन्ही निवडणुकांमध्ये केवळ ३६ पक्ष लोकसभेत दिसले. त्यातही दोन्ही निवडणुकांत २० पक्षांचे केवळ ३ किंवा त्यापेक्षा कमी सदस्य होते.
- महाराष्ट्र विधानसभेच्या सन २००९ मधील निवडणुकीत २७३; तर सन २०१४ मधील निवडणुकीत २०२ पक्षांनी आपले उमेदवार उभे केले होते. त्यापैकी सन २००९ मध्ये १४; तर सन २०१४ मध्ये १२ पक्ष विधानसभेत दिसले. त्यातही सन २००९ च्या निवडणुकीत ७ आणि सन २०१४ च्या निवडणुकीत ८ पक्षांचे केवळ ३ किंवा त्यापेक्षा कमी सदस्य होते.
- छोट्या पक्षांसमोर टिकून राहण्याचे मोठे आव्हान आहे. कार्यकर्ते मिळविणे, टिकविणे आणि त्यांचा उत्साह वाढविणे महत्वाचे असते.
- राजकीय पक्षांना वर्गणी, देणग्या, निवडणुका या खर्चिक बाबीही पेलाव्या लागतात. परिणामी छोट्या पक्षांचा राजकीय यशाचा आलेख कमी असतो.
- पक्षाची संघटनबांधणी करण्यासाठी स्थानिक स्तरावरील यंत्रणा, संलग्न संघटनांचे जाळे, पक्षांतर्गत लोकशाही आणि सर्व कार्यकर्त्यांच्या अपेक्षांच्या संतुलनासाठी सजग राहावे लागते.
- पक्षाला जनमताचा पाठिंबा मिळवून देतो, अशी कंत्राटे घेणारे लोक तयार झाले आहेत; पण ते लोक निव्वळ थापा मारतात.
- लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी राजकीय मानसशास्त्रात अनेक क्लृप्त्या असल्या तरी हे शास्त्र अवघड आणि अदृश्य आहे.
- सर्वात महत्वाचा मार्ग म्हणजे प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून सतत लोकांच्या डोळ्यासमोर राहावे लागते; परंतु प्रसारमाध्यमातील जाहिरातींवर किंवा एकाच नेत्याच्या आधारे पक्ष चालविण्याचा प्रयत्न चिरंतर यश देत नाही.
- पाठिंबा मिळविण्यासाठी एका सामाजिक गटाच्या हिताचा पाठपुरावा करणे, मोठ्या सामाजिक आघाड्या उभारणे आणि लागेबांध्यांचे जाळे विणणे हेदेखील मार्ग अवलंबविले जातात.
- भावनिक आव्हानांद्वारे यश संपादन करण्याचा कल अलीकडे जगभर दिसतो आहे. त्याबाबत अमेरिका, रशिया आणि तुर्कस्तानातील निवडणुकांत ही प्रारूपे विकसित होताना दिसली; पण ही प्रारूपे फार काळ टिकत नाहीत.

- जगभरातील राजकीय पक्षांपुढे अधिमान्यता आणि विश्वासार्हतेसंदर्भात मोठा पेचप्रसंग उभा ठाकला आहे. जगभर पक्षांची सभासद संख्या कमी-कमी होत आहे. कारण संशयाचे वातावरण आहे.
- लोकप्रियता मिळते; पण लोकांचा विश्वास मिळत नाही, अशा अवस्थेत राहायचे की विश्वास संपादन करायचा? हा महत्वाचा प्रश्न आहे.
- सत्ता संपादन करणे हे राजकीय पक्षाच्या जीविताचे उद्दिष्ट्य आहे; परंतु लोकप्रियतेच्या आधारे लोकपरमार्थ साधत लोकशाही भक्कम करायची की, केवळ निवडणुका जिंकून फक्त कार्यकर्त्यांची सोय लावण्यावर समाधान मानायचे, हा चिंतनाचा मुद्दा आहे.
- स्वार्थ आणि परमार्थाचा विचार करताना राजकारण हा पेशा आहे का? तो व्यवसाय आहे का? नसेल तर स्वत:चे व्यवसाय सांभाळून राजकारण कसे करायचे? याकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे.
- स्वत:चे व्यवसाय किंवा हितसंबंध राजकीय कामांच्या आणि भूमिकांच्या आड येणार नाहीत, याची काळजी घेणे महत्वाचे आहे.
- राजकीय पक्षांच्या देणगीदारांच्या अपेक्षांचा आणि लोकहित साधण्याचा समतोल महत्वाचा ठरतो. त्यासाठी हितसंबंधांचा संघर्ष (कॉंफ्लिक्ट ऑफ इंट्रेस्ट) टाळायला हवा. म्हणूनच राजकीय पक्षांनी स्वत:हून किमान बंधनांचा स्वीकार केला पाहिजे. अन्यथा मतदारांची नाराजी वाढत जाईल.
- भारतीय लोकशाहीच्या यशात राजकीय पक्षांचा मोठा वाटा आहे. मात्र लोकशाहीच्या विस्तारासाठी आणि तिची आशयघनता वाढविण्याची मोठी जबाबदारी राजकीय पक्षांवर आहे.
- लोकांच्या मनात राजकीय पक्षांविषयी तुच्छताभाव वाढू द्यायचा? की; आदरभाव वाढवायचा? हा विश्वासार्हतेचा प्रश्न राजकीय पक्षांच्याच हातात आहे.
- राजकीय क्षेत्रात सगळे लबाड किंवा वाईट नसतात; परंतु वाईट प्रवृत्तींनी चांगल्या प्रवृत्तींना हद्दपार केल्यास लोकशाही अडचणीत येऊ शकते.

**गंभीर गुन्हे आणि करोडपती उमेदवार: प्रा. फडके**

पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या विविध आयामांबाबत प्रथमच संशोधन केले आहे; तसेच असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्मस या स्वयंमसेवी संस्थेने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील उमेदवारांच्या आर्थिक आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीसंदर्भात पहिल्यांदा विश्लेषण केले आहे. त्याचे सारांश स्वरुपात प्रा. फडके यांनी सादरीकर केले. ते असे:

- राज्यातील महानगरपालिका निवडणुकीतील साधारणत: ९ टक्के उमेदवारांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे.
- बृहन्मुंबई आणि नाशिक महानगरपालिका निवडणुकीत सर्वाधिक प्रत्येकी २९ टक्के उमेदवार करोडपती.
- बहुतांश उमेदवार राजकीयदृष्ट्या सक्रिय कुटुंबातील व उमेदवारी देताना गुणवत्तेपेक्षा राजकीय पार्श्वभूमीच्या निकषाला प्राधान्य.
- नगरविकासाची दूरदृष्टी असणारे उमेदवार राजकारणाच्या गुन्हेगारीकरणामुळे राजकीय व्यवस्थेपासून लांब.
- श्रीमंत उमेदवार पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकतात. खर्च मर्यादेपेक्षा कमीत कमी चौपट जास्तीचा खर्च करतात.
- उमेदवार माझे प्रश्न सोडण्यासाठी उपलब्ध असावा, अशा मतदारांच्या सर्वसाधारण अपेक्षा.
- उमेदवार सुशिक्षित असावा, प्रभागस्तरीय मुद्दे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बैठकीत उपस्थित करण्यासाठी तो सक्षम असावा.

**खुले चर्चासत्र**

उद्‌घाटन सत्रानंतर खुले चर्चासत्र झाले. यात श्री. चन्ने यांनी खुल्या चर्चासत्रात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या प्रश्नांचे व शंकांचे निरसन केले. आरएससीडीचे संचालक भीम रासकर, राजकीय अभ्यासक डॉ. मृदुल निळे, डॉ. ए. एन. सिद्धेवाड, डॉ. सुनंदा तिडके, सीएलजीएफच्या अनुया कुवर आदीदेखील खुल्या चर्चासत्रात सहभागी झाले होते. या चर्चासत्रात काही सूचनाही आल्या त्या अशा:

- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राऐवजी ई-वोटिंग असावे. कुठूनही मतदान करता यावे. मतदानाचा एकच दिवस नसावा. मतदानाचे १५ दिवस असावेत.
- प्रसारमाध्यमांनी सर्व पक्षांना समान वागणूक द्यावी, यासाठी उपाययोजना कराव्यात.
- केवळ राजकीय पक्षांच्या उमेदवारांनाच निवडणूक लढण्याची संधी असावी. अपक्षांमुळे घोडेबाजाराला वाव मिळतो.
- नोंदणीकृत पक्षांना सर्व निवडणुकांमध्ये समान चिन्हे मिळावित.
- आधार कार्डशिवाय मतदार यादीत नाव नोंदविले जाऊ नये आणि मतदार यादीत नोंदविलेल्या नावाला आधारकार्ड जोडायला हवे.
- नामनिर्देनपत्रे मागे घेण्याची सुविधा नसावी. त्यामुळे भ्रष्टाचाराला संधी मिळते.
- लहान पक्षांना सीएसआरच्या धर्तीवर निधी मिळावा.
- सर्व पक्षांनी एकाच ठिकाणी येऊन प्रचार करावा. त्यासाठी आयोगाने बैठक किंवा सभा आयोजित करण्यासाठी पुढाकार घ्यावा.
- नामनिर्देशनपत्र भरताना उमेदवारासोबत त्याच्या जवळच्या २५ जणांची माहिती घ्यावी व निवडणुकीचे सर्व व्यवहार त्यांच्यामार्फतच व्हावेत.
- आरक्षित जागेवरून निवडणूक लढविण्यासाठी लागणाऱ्या जातवैधता प्रमाणपत्राबाबत कायमस्वरुपी एकच धोरण असावे.

**कार्यशाळेचा सारांश**

डॉ. मृदुल निळे यांनी सामारोपप्रसंगी कार्यशाळेतील विचारमंथनाचा सारांश मांडला. तो असा:

- राजकीय स्वरुपाचे गुन्हे व इतर गुन्हे यातला फरक लक्षात घेतला पाहिजे.
- राजकीय पक्षांकडून मतदारांना देण्यात येणारी प्रलोभने आणि आमिष; तसेच आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळण्यासाठी सक्षम कायदा आवश्यक आहे.
- पक्षांतर्गत लोकशाही सुदृढ करण्यासाठी निवडणूक आयोगाने पुढाकार घ्यावा.
- नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास निवडणुका रद्द करून फेर मतदान घ्यावे व आधीचे उमेदवार अपात्र ठरवावेत.
- लहान पक्षांनाही वाव मिळावा, यासाठी एकत्रित प्रचार करण्याच्या सुविधेबाबत निवडणूक आयोगाने पुढाकार घ्यावा.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील कायद्यांत सुसूत्रता आणणे आवश्यक आहे.

डॉ. मृदुल निळे यांनी सूत्रसंचालन केले. आयोगाचे जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे यांनी आभार मानले.

**फोटो ओळी**

राज्य निवडणूक आयोगातर्फे राज्य घटनेतील ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त येथील एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात ७ मे २०१८ रोजी आयोजित राजकीय पक्षांच्या कार्यशाळेत आयोगाच्या 'निवडणूक वार्ता'चे प्रकाशन करण्यात आले. यावेळी उपस्थित राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांच्यासह राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष व मंत्री श्री. महादेव जानकर, आयोगाचे सचिव श्री. शेखर चन्ने, डॉ. सुहास पळशीकर, डॉ. विश्वंभर चौधरी, श्री. जगदीश मोरे आदी.

0-0-0